# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०३/१२/१७

## दि.०२/१२/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ६८१/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | हिरु राठोड,वय २१ वर्षे,रा.चिखली,पुणे |
| **आरोपी** | विशाल बबन डफळ,वय २४ वर्षे,रा.अभंग विश्व सोसायटी, देळु आळंदी रोड चिखली,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१२/२०१७ रोजी ११/३५ वा.चे सुमारास जयभवानी चौकातील मेनरोड रामदसनगर, चिखली, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांची पुतणी नामे अक्षदा तुकाराम राठोड,वय ३ वर्षे,रा.रामदासनगर चिखली,पुणे हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भोये ९९६९४२९७२८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे २३२/१७,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | श्रीमती सरोज खांडेकर,वय २५ वर्षे, रा.च-होली,पुणे |
| **आरोपी** | राजु मेहता व इतर सहा (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/११/२०१७ रोजी १०/१५ वा.चे सुमारास तनिष्क ऑर्चिड कन्स्ट्रक्शन,तापकीर नगर च-होली,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम ठेकेदाराने त्याचे पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील फिर्यादी यांचा पती बिगारी कामगार मयत इसम नरेंद्र आसाराम खांडेकर,२८,रा.च-होली,पुणे हा इमारतीचे ५ व्या मजल्यावर काम करीत असताना,त्याचा तोल जावुन,तो वरून खाली उघडया डक्टवर पडुन,त्यांचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन,तो डॉक्टर तपासणीपुर्वीच मयत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शेंडगे ९३२६६१५८४० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ५३२/१७,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२४,५०४,आर्म ॲ.क.४(२५), महा. पो.का.क.३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | कृष्णा गंगाराम जमादार, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. विकास नगर, हिराबाई वसाहत, कासारवाडी, पुण |
| **आरोपी** | १)सागर रमेश बोध,वय २१ वर्षे,रा. केशवनगर कासारवाडी पुणे २) आमजद इस्माहिल शेख, वय २५ वर्षे,रा. समता मित्र मंडळाजवळ कासारवाडी पुणे ३) उमेश सोमनाथ मिसार,वय २१ वर्षे,रा. रुम नं ४ संभेराव बिल्डींग बी यु भंडारी पेटोलपंप शेजारी कासारवाडी पुणे ४) मोसीन मेहबुब शेख वय १९ रा शिवशंकर कॉलनी नं १ चकपाणी वसाहत भोसरी पुणे ५) आतु शेख, रा. पाटणेचाळ, कासारवाडी, पुणे व त्यांचे इतर साथिदार (अ.क्र.१ ते ४ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/१२/२०१७ रोजी रात्रौ २०/३० वा.चे सुमारास विकास नगर, हिराबाई झोपडपट्टी, कासारवाडी, पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी फिर्यादी व मोसीन शेख याच्या बरोबर झालेल्या पुर्वीच्या भांडणाचा राग मनात धरुन, संगणमत करुन, गैरकायद्याची मंडळी जमवुन, आरडा ओरडा करुन, फिर्यादी व त्याच्या इतर तीन मित्रांना कोयत्याने व लाकडी दांडक्याने मारहाण करुन जखमी केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. के.के.लांडगे ९९२३१०३४२७ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५६९/१७,भादविक ३५३,२८३,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | आजीनाथ जगताप, वय ५८ वर्षे, रा.कात्रज कोंढवा रोड, कात्रज ,पुणे |
| **आरोपी** | अंबादास गवळी, वय ४५ वर्षे,रा.कात्रज,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/१२/२०१७ रोजी २०/२० वा.चे दरम्यान कात्रज जुना बस स्टॅण्ड, कात्रज,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दिनाकं ०१/१२/२०१७ रोजी सायंकाळी २०.२० वा.चे सुमा. कात्रज जुना बस स्टॅण्ड कात्रज,पुणे येथे कंट्रोलर म्हणुन कर्तव्यावर असताना इसम नामे अंबादास गवळी, याने नमुद ठिकाणी त्यांची मोटार सायकल लावली असताना,फिर्यादी यांनी त्यास मोटार सायकल काढण्यास लावल्याचे कारणावरुन, फिर्यादी करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण करुन, हाताने मारहाण करुन, शिवीगाळ केली तसेच फिर्यादी यांचे शेजारी उभा असलेला चालक नामे- शिवाजी हनुमंत घोलप, वय. ४० वर्षे, रा.कात्रज,पुणे याला सुध्दा त्याने हाताने मारहाण करुन,शिवीगाळ केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.एच.अहिवळे, ९६५७५११८०१ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४५१/१७,भादविक ४२०,४०६. |
| **फिर्यादी** | निलेश होनकळस वय ३० वर्षे,रा.थटे वस्ती, खराडी, पुणे. |
| **आरोपी** | गणेश सुबराव गोरे,वय २६ वर्षे,रा.मु.पो.नाळवंडी, ता.जि.बिड.(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मार्च २०१७ ते आज पर्यंत आयसीआयसीआय बँक विमाननगर संभाजी नगर थिटे वस्ती चंदननगर खराडी पुणे |
| **तपशिल** | वर नमुद ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसम गणेश गोरे याने फिर्यादी व त्यांच्या आईचा विश्वास संपादन करुन,विमाननगर येथे पी.जी. (पेईंग गेस्ट) चा व्यवसाय पार्टनरशिप मध्ये सुरु करण्यासाठी १८ लाख रुपये रोख रक्कम तसेच औरंगाबाद येथील गेस्ट हाऊस रिन्युवेशनच्या नावाखाली १ लाख ८४ हजार रु.चे सोने घेवुन कुठलाही व्यवसाय सुरु न करता, फिर्यादी यांचा विश्वासघात करुन एकुण १९ लाख ८४ हजार रु.ची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एम.आठरे ८२७५२०१५२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**